दै. लोकमत दि. ०८.०६.२५

# पोलिस उपमहानिरीक्षकांकडून दोन राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क



**नांदेड :** केरळ राज्यातील कोची येथे झालेल्या अखिल भारतीय क्रीडा स्पर्धेत नांदेड पोलिस दलातील राष्ट्रीय खेळाडू मिलिंद लोणे व सुषमा लोखंडे यांनी पदक प्राप्त करून नांदेड पोलिस दलाचा राष्ट्रीय पातळीवर ठसा उमटविला. या कामगिरीबद्दल नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दोन्ही खेळाडूंचा बक्षीस देऊन सन्मान केला.

राष्ट्रीय खेळाडू व नांदेड पोलिस मुख्यालयात कार्यरत मिलिंद लोणे यांनी टेबल टेनिसमध्ये पुरुष एकेरीत कांस्यपदक पटकावले तर वाहतूक शाखेतील सुषमा लोखंडे यांना देखील पदक मिळाले. या खेळाडूंचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्यासह जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सूरज गुरव, खंडेराय धरणे, पोलिस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनीही स्वागत केले.